# जनसंपर्क अधिकारी


**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३०१ - २३** **दिनांक : - ०५/०९/२०२३**

## ०२ लाख रुपये किंमतीचे ब्राऊन शुगर व गांजा या अंमली पदार्थासह सराईत आरोपीतास अटक
## विरार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी.

विरार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक- ०४/०९/२०२३ रोजी १५.४५वा.चे सुमारास कालिका माता मंदिरा जवळ, कारगिल नगर, मनवेलपाडा, विरार(पु.), ता.वसई येथे एक इसम ब्राऊन शुगर (गर्दा) व गांजा विक्री करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशिर बातमी विरार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे यांस मिळाल्याने, सदर बातमीचे आधारे मिळालेले बातमीचा आशय मा.वरिष्ठांना कळवुन, त्यांनी दिलेले आदेशान्वये लागलीच सदर ठिकाणी सापळा रचुन आरोपीत यास शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपीत याने त्याचे नाव- राहुल ओबांसे, रा.कारगिल नगर, मनवेलपाडा, विरार पुर्व असे सांगितले. नमुद आरोपीताची अंगझडती घेतली असता, त्याचे कब्जात १७ ग्रॅम वजनाचा एकुण-१,७०,०००/- रुपये किंमतीचा ब्राऊन शुगर नावाचा अंमली पदार्थ व १ किलो ५०० ग्रॅम वजनाचा ३०,०००/- रुपये किंमतीचा गांजा नावाचा अंमली पदार्थ, असा एकुण- २,००,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने, तो जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने विरार पोलीस ठाणे गु.रजि.नं. ८६१/२०२३, गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापार परिणाम करणारे पदार्थ (NDPS) अधिनियम-१९८५ चे कलम-८(क), २१(ब), २०(ब) ii(ब) प्रमाणे दि.०४/०९/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त साो, परिमंडळ-३, विरार, श्री.रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली विरार पोलीस ठाणेचे श्री.राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री.अभिजित मडके, पोलीस निरीक्षक (गुन्हे), व गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. सचिन लोखंडे, संदिप जाधव, विशाल लोहार, इंद्रनिल पाटील, संदिप शेरमाळे, योगेश नागरे, पो.अं.संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, रोशन पुरकर, प्रफुल सोनार यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

**----0000----**